प्रेस नोट दि.०६/०३/२०२५

# वाहन चोरी व घरफोडी करणारा विकास भिवा पवार हा एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्द.

सोलापूर शहरातील **एमआयडीसी, जोडभावी पेठ, फौजदार चावडी, सलगर वस्ती आणि सदर बझार** पोलीस ठाणे हद्दीतील सराईत गुन्हेगार, **विकास भिवा पवार, वय २४ वर्षे, रा. धोत्रीकर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर** हा मागील काही वर्षांपासुन सातत्याने जिवघेण्या घातक शस्त्राने ईच्छापुर्वक दुखापत करणे, जबरी चोरी करणे, खंडणी मागणे, घरफोडी करणे, मोटार सायकल चोरी करणे, बेकायदेशिर जमाव जमवणे, दगडफेक करणे आणि घातक शस्त्राने धमकाविणे या सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे साथीदारांच्या मदतीने, अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी करीत आला आहे. त्याच्या विरुध्द अश्या प्रकारे गंभीर स्वरुपाचे एकुण १५ गुन्हे सोलापुर शहरात दाखल आहेत. त्याचे या गुन्हेगारी कृत्यामुळे सोलापुर शहरातील नागरीकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाली आहे. विकास भिवा पवार याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे, त्याची सोलापुर शहरातील व्यापारी व सामान्य नागरीकांमध्ये दहशत असुन, त्याचे विरुध्द सामान्य नागरीक उघडपणे पोलीसांना माहीती देत नाहीत.

**विकास भिवा पवार यास त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून परावृत्त करण्यासाठी सन २०२२ मध्ये क. ११०(ई)(ग) फौ.प्र.सं अधिनियमानुसार प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतरही विकास भिवा पवार याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही आणि त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा होईल अशी वरीलप्रमाणे गुन्हेगारी कृत्य चालु ठेवली.** त्यामुळे त्याचे गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी, मा.एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापुर शहर यांनी, दि.०५/०३/२०२५ रोजी त्याचे विरुध्द एमपीडीए अधिनियम, १९८१ चे कलम ३ अन्वये स्थानबध्दतेचे आदेश निर्गमित करुन, त्यास दि.०६/०३/२०२५ रोजी स्थानबध्द आदेशाची बजावणी करुन, येरवडा कारागृह, पुणे येथे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही, मा. एम. राज कुमार, मा.पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली, मा.डॉ.दीपाली काळे पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा), मा. विजय कबाडे पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), राजन माने, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, प्रताप पोमण, सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-०१, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे, प्रमोद वाघमारे, वपोनि, एमआयडीसी पोलीस ठाणे, सपोनि/तुकाराम घाडगे गुन्हे शाखा, एमपीडीए पथकातील अंमलदार पोहेकॉ-/८३३ विनायक संगमवार, पोहेकॉ/१२५४ सुदीप शिंदे, पोशि/१९१६ अक्षय जाधव, पोशि/६५४ विशाल नवले यांनी केली आहे.

---

६/३

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
यांचे करिता

**सोलापूरातील प्रसिध्द दैनिक वृत्तपत्र/इलेट्रीक मिडीया संपादक**
**वरीलप्रमाणे बातमीपत्र आपले लोकप्रिय दैनिकामध्ये जनहितार्थ प्रसिध्द करणेस विनंती आहे.**